MHNS190002242025

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | - | २९.०१.२०२५ |
| खटला नोंदणी दिनांक | - | २९.०१.२०२५ |
| खटला निकाल दिनांक | - | १०.०३.२०२६ |
| निकालाची अवधी | - | व. म. दि.<br>०१ ०१ १२ |

| | |
|---|---|
| | **येवला येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**<br>**(पिठासिन अधिकारी डी. एम. गुलाटी)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.४७/२०२५ नि.क्र.३६** |
| | (प्रथम खबर I-३२३/२०२५, भा.द.वि कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे |
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फतः ठाणे अंमलदार,<br>येवला शहर पोलीस स्टेशन, येवला,<br>जि. नाशिक. |
| तर्फे | विव्दान विधिज्ञ श्री. एस.एस.भाटे. |
| आरोपी | **१. सचिन नामदेव मुळजकर,**<br>वय –४० वर्षे,<br>**२. नामदेव शंकरराव मुळजकर,**<br>वय –७४ वर्षे,<br>**३. सुंदरताई नामदेव मुळजकर,**<br>वय – ६४ वर्षे,<br>आरोपी क्र. १ ते ३ रा. तुळजाई पुष्पानगरी,<br>शक्तीनगर, सि.बी.एस.रोड औरंगाबाद,<br>सचिन प्रोव्हीजन अण्ड जनरल स्टोअर्स,<br>झेरॉक्स, नागेश्वरवाडी, औरंगाबाद.<br>**४. सुकदेव कारभारी वाघ,**<br>वय – ६६ वर्षे,<br>रा. धामणगाव, ता. येवला.<br>**५. बाबासाहेब वाल्मीक देवरे,**<br>वय – ६०,<br>**६. मिना साहेब देवरे,**<br>वय – ६०,<br>**७. प्राजक्ता संतोष देवरे,**<br>वय – ३५,<br>आरोपी क्र. ५ व ७ रा. माउली लॉन्सच्या पाठीमागे,<br>म्हसोबा नगर, विंचुर रोड, येवला, ता. येवला. |
| तर्फे | विव्दान विधिज्ञ श्री.एस.एल.कहाते. |

| | | |
|---|---|---|
| घटना घडल्याची तारीख | : | २५.०२.२०२४ |
| प्रथम खबर दिनांक | : | ०७.०९.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची दिनांक | : | २९.०१.२०२५ |
| न्यायालयाने दोषारोप निश्चित केल्याची दिनांक | : | ०९.०२.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | : | ०९.०२.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १०.०३.२०२६ |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची दिनांक | जामिनावर मुक्तता केल्याची तारीख | गुन्हयाच ी कलमे | आरोपीस शिक्षा करण्यात आली किंवा निर्दोष ठरविण्यात आले | देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान आरोपीने कारागृहात घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **सचिन नामदेव मुळजकर** | सी.आर.पी.सी.४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | २९/०१/२०२५ | भा.द.वि चे कलम ४९८-अ, ३२३, ५०४ , ५०६ प्रमाणे | निर्दोष | --- | --- |
| २. | **नामदेव शंकरराव मुळजकर** | सी.आर.पी.सी.४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | २९/०१/२०२५ | | निर्दोष | --- | --- |
| ३. | **सुंदरताई नामदेव मुळजकर** | सी.आर.पी.सी.४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | २९/०१/२०२५ | | निर्दोष | --- | --- |
| ४. | **सुकदेव कारभारी वाघ** | सी.आर.पी.सी.४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | २९/०१/२०२५ | | निर्दोष | --- | --- |
| ५. | **बाबासाहेब वाल्मीक देवरे** | सी.आर.पी.सी.४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात | २९/०१/२०२५ | | निर्दोष | --- | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आली. | | | | | |
| ६. | **मिना साहेब देवरे** | सी.आर.पी.सी.४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | २९/०१/२०२५ | निर्दोष | --- | --- | निर्दोष |
| ७. | **प्राजक्ता संतोष देवरे** | सी.आर.पी.सी.४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | २९/०१/२०२५ | निर्दोष | --- | --- | निर्दोष |

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार -**

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | शुभांगी | २९ | फिर्यादी |
| २. | शंकुतला सुदाम थोरात | ३० | साक्षीदार |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार -**

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**क) न्यायालयीन साक्षीदार -**

| क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची यादी व निशाण्या**

**अ) अभियोगपक्ष -**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | **निरंक** | |

**ब) बचावपक्ष -**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | निरंक | |

**क) न्यायालयीन दस्तऐवज -**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड) जप्त मुद्देमाल -**

| क्र. | वस्तुंचा तपशिल | आर्टीकल क्र. |
|---|---|---|
| | निरंक | |

**<u>न्यायनिर्णय</u>**

**(निकाल तारीख १० मार्च, २०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान चे कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

**<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे आहे-</u>**

२. फिर्यादीचे लग्न दि. ०२.०१.२२४ रोजी हिंदुधर्म शास्त्र रुढी परंपरेनुसार औरंगाबाद येथील सचिन नामदेव मुळजकर यांचेसोबत झाले होते. लग्न करुन ती सासरी नांदण्यास गेली. त्यानंतर त्यांना सुमार चार ते पाच दिवस चांगले नांदविले. त्यानंतर त्यांची सासु सुंदरताई नामदेव मुळजकर ही त्यांना स्वयंपाक करता येत नाही, तु आम्हाला जेउ-खाउ घालत नाही, आमची व्यवस्थीत ठेव ठेवत नाही, अशा कुरापती काढुन त्यांना त्यांची सासु व सासरे नामदेव शंकरराव मुळजकर मानिसक त्रास देवु लागले. त्यानंतर त्यांनी सदरची बाब त्यांच्या पतीस सांगितली असता, त्यांनी ऐकले नाही. त्यानंतर त्यांचे पती त्यांना म्हणाले की, मला भावना येत नाही, मला लग्न करण्याची इच्छा नव्हती, परंतु त्यांचे आईने बळजबरीने त्यांचे लग्न लावुन दिले आहे, असे सांगितले. त्यावर फिर्यादीने तिचे सासुला विचारले असता तिचे सासुने तिला सांगितले की, ही आपली घरतील खाजगी बाब असुन माहेरी किंवा इतर लोकांना सांगु नको, असा सल्ला दिला. त्यानंतर फिर्यादी दि. २५.०२.२०२४ रोजी तिचे माहेरी आल्यावर सदरचा प्रकार तिचे लग्न जुळवणारे मधस्थी सुकदेव कारभारी वाघ, रा. धामणगाव, बाबासाहेब वाल्मीक देवरे, रा. विंचुर रोड, येवला, सौ.मिना बाबासाहेब देवरे, सौ.प्राजक्ता संतोष देवरे, दोन्ही रा. विंचुर रोड, येवला यांना सांगितले असता ते म्हणाले की, आम्हाला याबददल काहीच विचारु नको, तुम्हाला काय करायचे ते तुम्ही बघुन घ्या. फिर्यादीने सदरचा प्रकार तिचे घरी सांगितला. तिचे सासुने तिच्या अंगावरील मंगळसुत्र व कानातले काढुन घेवुन तिला नेसत्या वस्त्रानिशी घरातुन काढुन दिले व म्हणाले की, तु जर कुठे तक्रार केली तर तुझ्या घरच्यांना विनाकारण खोटया भानगडीत अडकवुन तुझा काटा काढु, असा दम दिला. म्हणुन फिर्यादीने वरील

आरोपींविरुध्द फिर्यादी दाखल केली.

३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने येवला तालुका पोलीस स्टेशन, येवला, ता. येवला, जि. नाशिक येथे गु.र.नं.I- ३२३/२०२५ भा.द.वि कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हयाची आरोपीं विरुध्द नोंद झाली. तपासिक अंमलदार एम.टी.गेठे, यांनी त्यांचे तपासाअंती आरोपीं विरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

४. दोषारोपपत्राचे तथा दस्तऐवजाचे अवलोकन करुन नि.क्र. २६ अन्वये आरोपीविरुध्द कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केला, ज्याअर्थी आरोपीने गुन्हयास नाकबुली नि.क्र. २७ ते ३३ अन्वये दर्शविली व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीं विरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा नसल्याने त्याचे कलम ३१३(१) (ब) फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणेचे बयान वगळण्यात आले.

६. अभियोगपक्ष व आरोपीपक्षाचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखाचे अवलोकन केले असता, न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | दिनांक २५.०२.२०२४ तुळजाई पुष्पानगरी, सी.बी.एस. रोड, औरंगाबाद येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला वेळोवेळी शारीरिक व मानसिक जाच छळहाट करुन भा.द.वि. कलम ४९८अ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नाही.** |
| ०२. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस मारहाण करुन दुखापत केल्याचे व त्यायोगे भा.द.वी कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०३. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानीत केल्याचे व दुसरा गुन्हा | |

| | | |
|---|---|---|
| | करण्याकरीता अथवा सार्वजनीक शांतता भंग होणे करीता त्यांना प्रक्षोभित केल्याचे आणि त्यायोगे भा.द.वी कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०४. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिल्याचे व त्यायोगे भा.द.वी कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०५. | आदेश काय? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

**- <u>का र ण मि मां सा</u> -**

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ करीता</u> :-**

७. मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी संलग्नीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांना एकत्र चर्चेस घेत आहे. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करण्याकरीता फिर्यादी शुभांगी सचिन मुळजकर (स.सा.क्र.१) हिस तपासले. फिर्यादीने तिचे सरतपासात असे सांगितले की, आरोपी क्र. १ तिचे पती असुन आरोपी क्र. २ ते ७ त्यांचे नातेवाईक आहे. आरोपी क्र. १ सोबत त्यांचे लग्न दि. २ जानेवारी २०२४ रोजी झाले. त्या लग्नानंतर नांदण्याकरीता औरंगाबाद येथे गेल्या. आरोपीने त्यांना व्यवस्थीत नाही नांदविले. त्यानंतर त्यांनी केस दाखल केली. आरोपीने त्यांना काय त्रास दिला याबाबत त्यांना काही सांगता येणार नाही. त्याबाबत त्यांनी फिर्याद दाखल केली होती. त्यांनी फिर्यादीवरील त्यांची सही ओळखली व त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले.

८. शंकुतला सुदाम थोरात (सा.क्र.२) यांनी त्यांच्या सरतपासात सांगितले की, आरोपी क्र. १ हे त्यांच्या मुलीचे पती आहे व आरोपी क्र. २ ते ७ हे त्यांचे नातेवाईक आहे. त्यांच्या मुलीचे लग्न आरोपी क्र.१ सोबत दि. २ जानेवारी, २०२४ रोजी झाले. लग्नानंतर ती नांदण्याकरीता औरंगाबाद येथे गेली. आरोपीने त्यांच्या मुलीला व्यवस्थीत नांदविले नाही. त्यानंतर तिने केस दाखल केली. आरोपीने तिला काय त्रास दिला याबाबत त्यांना काही सांगता येणार नाही.

९. या प्रकरणात अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले. शुभांगी सचिन मुळजकर (सा.क्र.१) हे फिर्यादी आहेत व शंकुतला सुदाम थोरात (सा.क्र.२) हे साक्षीदार आहेत. शुभांगी सचिन मुळजकर (सा.क्र.१) व शंकुतला सुदाम थोरात (सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले आहे की, ते आरोपींना ओळखतात. शुभांगी सचिन मुळजकर (सा.क्र.१) हिचे लग्न २ जानेवारी २०२४ रोजी झाले आणि लग्नानंतर ती नांदण्याकरीता औरंगाबाद येथे गेली. आरोपीने तिला व्यवस्थीत नांदविले नाही म्हणुन तिने केस दाखल केली. साक्षीदाराने त्याच्या साक्षीमध्ये, लग्नानंतर आरोपीने शुभांगी सचिन मुळजकर (सा.क्र.१) हिला टोचुन बोलायचे, तुला स्वयंपाक येत नाही, तु आम्हाला जेउ खाउ घालत नाही, तसेच, तिचे पती तिला म्हणाले की, मला भावना येत नाही, मला लग्न करण्याची इच्छा नव्हती, परंतु त्यांच्या आईने बळजबरीने त्यांचे लग्न लावुन दिले, अशी कुरापत काढुन मानसिक व शारिरिक त्रास दयायचे याबाबत काही सांगितले नाही. म्हणुन आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचा मानसिक व शारिरिक छळ केला याबाबत काही सांगितले नाही. म्हणुन आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. म्हणुन मी, **मुददा क्र.१ ते ४** चे उत्तर नकारार्थी नोंदविते व **मुददा क्र. ५** करीता खालील आदेश पारित करते.

## आदेश

१. **आरोपी क्र.१ सचिन नामदेव मुळजकर, २. नामदेव शंकरराव मुळजकर, ३. सुंदरताई नामदेव मुळजकर, ४. सुकदेव काभारी वाघ, ५. बाबासाहेब वाल्मीक देवरे, ६. मिना साहेब देवरे, ७. प्राजक्ता संतोष देवरे** यांना भारतीय दंड विधान, १८६० मधील कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ नुसार जामीन ची पुर्तता करावी.

३. आरोपींचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात यावे.

DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Digitally signed by DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Date: 2026.03.14 17:32:26 +0530

स्थळ :- येवला.
दिनांक :- १०.०३.२०२६

(डी.एम.गुलाटी)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, येवला,
जि. नाशिक